# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/10/2023 (बुधवार) सकाळ


---

### अनैतिक देहव्यापार करण्यास प्रवृत्त करणारे आरोपी गजाआड पोलीस स्टेशन सावनेरची कारवाई

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०१ कि. मी अंतरावरील रॉयल लॉज दादजी नगर सावनेर येथे दिनांक ०९/१०/२०२३ चे २०.४५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारां कडुन माहीती मिळाली की, रॉयल लॉज दादजी नगर सावनेर येथे आरोपी क्र. १) अरूण मदन मोहन रूषिया, वय ६२ वर्षे, रा. वार्ड नं. ११, जुना धान्य गंज सावनेर जि. नागपूर हा सार्वजनिक ठिकाण असलेले Indian Medical Association हॉलचे जवळील आपल्या ताब्यातील घराचा कुंटणखाना म्हणून वापर करीत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ यांनी नमुद घटनास्थळी रेड केली असता त्यात आरोपी क्र. २) नामे— रंजित मारोतराव वानखडे, वय २९ वर्षे, रा. झिल्पा, तह. काटोल जि. नागपूर, ह. मु. मनिष नगर बेसा रोड अथर्व धान्य भंडार जवळ नागपूर व पिडीत महिला मिळुन आली आरोपी क्र. २) याने पिडीतेला वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त केले. पोलीस स्टाफ यांनी रेड कारवाई करून आरोपीतांना ताब्यात घेतले. आरोपी क्र. १ व २ यांचेवर कलम ३, ४, ५, ६, ७ अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधीक्षक श्री संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, सहायक पोलीस निरीक्षक मंगला मोकासे, सहायक फौजदार कडु, पोलीस हवालदार सुनिल तलमले, राजेंद्र हावरे, महिला पोलीस हवालदार ज्योती नेवारे, पोलीस शिपाई रवि मेश्राम, सतिश देवकते यांनी पार पाडली.

### घरफोडी करण्याचा प्रयत्न

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत मौजा येरला इंडसंन्ड बॅक ०५ किमी पुर्व वार्ड नं ०२ येथे दिनांक ०९/१०/२०२३ चे १८.३० वा. ते दिनांक १०/१०/२०२३ चे ०६.२० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सुशांत सुधाकर कोलतेवार, वय २४ वर्ष, रा. कामठी येरखेडा नगर वार्ड क्र. ०३ यांचे रीपोर्ट वरून कोणीतरी अज्ञात आरोपीने इंडसंन्ड बॅकेचा दरवाजा तोडुन बॅकेच्या आतमध्ये प्रवेश करून लोखंडी आलमारी खुली करून तिजोरीचा समोरचा लोखंडी दरवाजा फोडण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ५११ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार नावेद खान हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर